# महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७-अ अंतर्गत आदेश

जा.क्र.जिउनिव/नियमन/कलम ७७-अ/अनंत नागरी/ 2091 /१७
कार्यालय — जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वर्धा,
केळकर वाडी, आर्वी रोड, वर्धा.
दिनांक - 16 / 06 /२०१७

वाचा :

१. **महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७-अ मधील वैधानिक तरतूद**
२. **श्री.डी.एच.रोहणकर, निवडणूक निर्णय अधिकारी, अनंत नागरी सहकारी पत संस्था मर्या.वर्धा र.नं.२६५ यांचे पत्र दिनांक १७/१२/२०१६**
३. **या कार्यालयाचे पत्र क्र.जिउनि/नियमन/कलम ७७-अ/अनंत ना.सह.पत/५४७/१७, दिनांक १८/२/२०१७**
४. **अध्यक्ष, अनंत नागरी सहकारी पत सस्था मर्या.वर्धा र.नं. २६५ यांनी दि.०९/०३/२०१७ अन्वये सादर केलेला खुलासा.**

---

ज्याअर्थी, **अनंत नागरी सहकारी पत संस्था मर्या.वर्धा र.नं.२६५** (यापुढे संस्था म्हणून संबोधित) हा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (यापुढे कायदा म्हणून संबोधित) व त्या अंतर्गतचे नियम १९६१ अंतर्गत नोंदणीकृत झाला असून संस्थेला सहकारी कायदा, नियम, संस्थेची मंजूर उपविधी तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकीय सुचना आणि निबंधकाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन करणे बंधनकारक आहे. आणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३-कब अन्वये सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण गठित करण्यात आले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम, २०१४ मधील तरतूदीनुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांना निवडणूक प्रक्रिया पार पाडणे बंधनकारक आहे. आणि

ज्याअर्थी, संस्थेचे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी उक्त वाचा क्र.२ अन्वये या कार्यालयास कळविले आहे की, संस्थेचा सन २०१५-१६ ते २०२०-२१ या कालावधीकरीता निवडणूक कार्यक्रम दिनांक २५/४/२०१६ रोजी प्रसिद्ध करण्यात आला होता. संस्थेच्या निवडणूकीबाबत दैनिक वर्तमानपत्रात देखील जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. परंतु एकही नामनिर्देशनपत्र निवडणूकीकरीता दाखल करण्यात आलेले नाही. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया पुर्ण होऊ शकली नाही. यावरुन संस्थेचे सभासद हे संस्थेचे कामकाज चालविण्यास उत्सुक नाही असे निदर्शनास येत असून संस्थेच्या समितीची रचना करण्यासाठी घेण्यात आलेल्या निवडणूकीत कोणतेही सदस्य निवडण्यात संस्थेने कसुर केला असल्यामुळे उक्त वाचा क्र.३ अन्वये उक्त वाचा क्र.१ चे तरतूदीनुसार नविन समिती पदग्रहण करेपर्यन्त संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी संस्थेवर प्राधिकृत अधिकाऱ्याची नेमणूक कां करण्यात येऊ नये? याबाबत हरकती व सुचना आणि संस्थेचा खुलासा सदर नोटीसच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आंत या कार्यालयास सादर करणेबाबत वरील संदर्भीय क्र.३ चे नोटीस नुसार कळविण्यात आले होते. आणि

ज्याअर्थी, संस्थेचे अध्यक्ष यांनी संदर्भीय क्र.४ चे पत्रान्वये त्यांचा खुलासा विहीत मुदत संपल्यानंतर विलंबाने सादर केलेला आहे. सदर खुलाशात त्यांनी नमुद केले की, संस्थेचे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या.वर्धा येथे जवळपास १८,००,०००/- सेव्हींग व मुदत ठेव स्वरुपात जमा असून बँकेकडून संस्थेस कोणतीही रक्कम मागील ४ वर्षांपासून मिळत नसल्याचे त्याचा परिणाम संस्थेच्या व्यवहारावर झाला. संस्थेची कमकुवत आर्थिक स्थिती मुळे पदाधिकाऱ्यांचा संस्थेकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला आहे. संस्थेच पदाधिकारी याला जबाबदार म्हणता येणार नाही असे नमुद केलेले आहे. आणि

ज्याअर्थी, संस्थेच्या संचालक मंडळाचा ५ वर्षांचा कालावधी संपुष्टात येण्यापुर्वी संस्थेची निवडणूक होऊन नविन समितीची रचना आवश्यक आहे. संस्थेच्या खुलाशावरुन सध्या कार्यरत असलेल्या संचालकांपैकी कोणीही निवडणूक लढविण्यास इच्छुक नसल्याचे दिसून येत आहे. तसेच इतरही सभासद निवडणूक लढविण्यास पुढे येत नाहीत. परिणामी विद्यमान समितीची मुदत संपल्यामुळे व कायद्यानुसार समितीला कोणतेही वैधानिक अधिकार प्राप्त होत नसल्यामुळे उक्त वाचा क्र.१ चे कलम ७७-अ मधील तरतूदीनुसार नविन समिती पदग्रहण करेपर्यन्त संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी संस्थेवर प्राधिकृत अधिकाऱ्याची नेमणूक करणे आवश्यक झालेले आहे अशी या कार्यालयाची खात्री झालेली असल्याने खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

# आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७(अ) मधील तरतूदीनुसार तसेच महाराष्ट्र शासन सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्र.सीएसएल-१४९३/११६२/ सी.आर.४७/१५-सी, दिनांक ७/८/१९९३ नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये मी, ए.बी.कडू, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वर्धा याद्वारे **अनंत नागरी सहकारी पत संस्था मर्या.वर्धा र.नं.२६५** या संस्थेवर प्राधिकृत अधिकारी म्हणून श्री.डी.एच.रोहणकर, प्राधिकृत अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी-२ अंतर्गत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.वर्धा यांची नियुक्ती करण्यात येत आहे. प्राधिकृत अधिकारी यांनी तात्काळ संस्थेचा प्रभार घेऊन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०, त्या अंतर्गतचे नियम १९६१, संस्थेची मंजूर उपविधी व या कार्यालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेश/सुचनांनुसार कामकाज करावे व पुढील सहा महिन्यात संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक घेऊन नविन समितीची रचना करावी.

सदर आदेश आज दिनांक १७/०६/२०१७ रोजी माझे सही व शिक्यानिशी पारीत करण्यात येत आहे.

SEAL OF THE DISTT DEPUTY REGISTRAR CO-OP. SOCIETIES WARDHA

**( ए.बी.कडू )**
**जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, वर्धा**

प्रति,

१. श्री.डी.एच.रोहणकर, प्राधिकृत अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी-२ अंतर्गत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.वर्धा
२. अध्यक्ष/सचिव, अनंत नागरी सहकारी पत संस्था मर्या.वर्धा र.नं.२६५

प्रत माहितीस्तव सविनय सादर :

१. मा.सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर

प्रत प्रसिद्धीकरीता रवाना :

१. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता.वर्धा
२. संघाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्धीकरीता
३. या कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिद्धीकरीता